# कृषी व ग्रामिण विकासात नाबार्ड ची भुमिका — एक अध्ययन

**डॉ. रविंद्र मोहतुरे**
सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग
एन.एम.डी. कॉलेज, गोंदिया
ईमेल — rcmohture67@gmail.com
Mobile no. – 9923191619

---

***सारांश :***

*देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा विकास हा सर्व समावेशक व्हावा सर्व क्षेत्राचा विकास समगतीने व्हावे याकरिता देशात पंचवार्षिक योजनांची आखणी करण्यात आली. देशाचा आर्थिक विकास हा ग्रामिण विकासावर आधारीत असून ग्रामीण क्षेत्राचा विकास साध्य करण्यासाठी नाबार्ड ची स्थापना जुलाई १९८२ मधे करण्यात आली. कृषी आणि ग्रामीण गैर कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कर्जाचा प्रवाह वाढवून ग्रामीण भारताची प्रगती करण्यासाठी ग्रामीण वित्तीय संस्थांना पूनर्वित सुविधा प्रदान करण्यासाठी आणि त्यांच्या संसाधनाचा आधार वाढविण्यासाठी नाबार्ड ही प्रमुख भुमिका निभावणारी सर्वोच्च संस्था आहे. संबंधित संशोधन लेखात कृषी व ग्रामिण विकासात नाबार्डची भूमिका व कार्य विशद करण्यात आलेली आहे.*

**किवर्ड** — नाबार्ड, ग्रामीण विकास, कृषी, पुर्नरवित्त, कृषी वित

---

**प्रस्तावना :**

भारत सरकारने त्याच्या नियोजनाच्या सुरूवातीच्या टप्पापासूनच कृषी अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी संस्थात्मक कर्जाचे महत्व ओळखले. कारण भारतात कृषी व्यवसाय करणारे शेतकरी आर्थिक परिस्थितीने गरीब असून त्यांना शेतीसाठी आर्थिक गरज पूर्ण करण्यासाठी ग्रामीण गैर संस्थागत कर्जावर अवलंबून रहावे लागत असे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सरकारने कृषी विकासाच्या दृष्टीने कृषीला वित्त पूरवठा करना—या विविध संस्थाची स्थापना केली जसे सहकारी संस्था, क्षेत्रिय ग्रामीण बॅंक, व्यापारी बॅंक, इत्यादी संस्थाच्या माध्यमाने सुलभ व्याज दराने कृषीला वित्त पुरवठा करण्यात आला. ग्रामीण विकासाशी संबंधित दराने क्रेडीट समस्याकडे अविभाजीत लक्ष, ठोस दिशा आणि केंद्रित दृष्टीकोन प्रदान करण्यासाठी नविन संघटनात्मक रचनेची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. या आकांक्षाची पूर्तता करणा—या विशिष्ट विकास वित्तीय संस्थेची निर्मितीची शिफारस करण्यात आली आणि यातूनच राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बॅंक (नाबार्ड) ची स्थापना १९८१ च्या अधिनियम ६१व्दारे करण्यात आली.

**संशोधन अभ्यासाची उदिष्टये :**

१. भारतातील ग्रामीण वित्त पूरवठयाबद्दल नाबार्डची भूमिका समजून घेणे.
२. भारतातील शास्वत विकासाबद्दल नाबार्डची विभीन्न कार्ये समजून घेणे.
३. ग्रामीण विकास आणि नाबार्ड यांच्यातील संबंध समजून घेणे.
४. कृषी विकास संबंधी नाबार्डच्या योजना जानुन घेणे

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत लघुशोध लेख वर्णनात्मक माहितीवर आधारीत असून यात माहिती प्राप्त करण्यासाठी दुय्यम माहिती संग्रहण पध्दती व्दारे माहिती गोळर केली असून यात वर्तमान पत्रे, मासीके, लेख, मीडीया अहवाल, जर्नल, या साधनाचा अवलंब करून लघूशोध लेख प्रस्तुत केला आहे.

**नाबार्ड — एक संक्षिप्त पार्श्वभुमी :**

कृषी अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी संस्थात्मक कर्जाचे महत्व ओळखून, भारतीय रिजर्व बॅकेने भारत सरकारच्या विनंतीनुसार या महत्वाच्या पैलूवर लक्ष ठेवण्यासाठी कृषी आणि ग्रामीण विकासासाठी संस्थात्मक कर्ज प्रणालीचे पूनरावलोकन करण्यासाठी एक समिती स्थापन केली. ही समिती ३० मार्च १९७९ रोजी भारत सरकारच्या नियोजन आयोगाचे माजी सदस्य श्री बी. शिवरामन यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. २८ नोव्हेंबर १९७९ रोजी सादर करण्यात आलेल्या समितीच्या अंतरिम अहवालात ग्रामीण विकासाशी संबधित क्रेडीट समस्याकडे अविभाजीत लक्ष, ठोस दिशा आणि केंद्रित दृष्टिकोन प्रदान करण्यासाठी नवीन संघटनात्मक रचनेची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. या आकांक्षाची पूर्तता करणाच्या विशिष्ट विकास वित्तीय संस्थेची निर्मिती ही त्याची शिफारस होती आणि राष्ट्रिय कृषी आणि ग्रामिण विकास बॅक (नाबार्ड) ची स्थापना १९८१ मधे संसदेने मंजूर केली. नाबार्ड १२ जुलै १९८२ रोजी भारतीय रिझर्व्ह बॅकेच्या कृषी पत कार्य आणि पूर्विच्या कृषी पूनर्वित व विकास महामंडळ (ARDC) च्या पूनर्वित कार्याचे हस्तांतरण करून अस्तित्वात आले. दिवंगत पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी ५ नोव्हेंबर १९८२ रोजी राष्ट्रसेवेला समर्पित केले.

१०० कोटी रूपयांच्या प्रारंभिक भांडवलासह स्थापित झालेली ३१ मार्च २०२० पर्यंत १४०८० कोटी इतके भाग भांडवल होते. नाबार्ड आज संपूर्णपणे भारत सरकारच्या मालकीची असून तिचे अधिकृत भाग भांडवल ३०००० कोटी रूपये आहे. नाबार्ड ग्रामीण, सामाजिक नवकल्पना आणि ग्रामीण भागात तळागळात सामाजिक उपक्रमांची स्थापना करण्यात महत्वाची भुमिका बजावत आहे. मे २०२३ पर्यंत, नाबार्ड देशातील ३१ प्रादेशिक कार्यालयाव्दारे कार्यरत आहे. या पक्रियेत त्याने सुमारे ४००० भागीदार संस्थासोबत भागीदारी केली आहे, नाबार्ड ग्रामीण भागातील विविध विकासात्मक उपक्रमांना चालना देण्यासाठी गुंतवणूक आणि उत्पादन क्रेडिट प्रदान करणा—या संस्थासाठी सर्वोच्च वित्तपूरवठा संस्था म्हणून काम करते. राज्य सहकारी बैंक, जिल्हा सहकारी मध्यवर्ती बैंक, आणि प्रादेशिक ग्रामीण बॅकाचे वैधानिक पर्यवेक्षण करते. पूनर्वसन योजना तयार करणे. पतसंस्थेची पनूर्रचना, कर्मचा—यांचे प्रशिक्षण देणे, भारतातील बॅकांना बचत गटांना कर्ज देण्यासाठी प्रोत्साहित करने. कृषी, लघुउदयोग, कुटीर आणि ग्रामोद्योग, हस्तकला आणि इतर ग्रामीण हस्तकला यांच्या विकासासाठी आणि पतपूरवठा सुलभ करण्यासाठी आदेश असलेली सर्वोच्च विकास बॅक म्हणून नाबार्डची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील ईतर सर्व संलग्न आर्थिक क्रिया कलापांना पाठिंबा देणे, एकात्मिक आणि शाश्वत ग्रामीण विकासाला चालना देणे आणि ग्रामीण भागाची सुरक्षित समृध्दी करणे ग्रामीण समृध्दीसाठी सहाय्यक म्हणून आपली भूमिका पार पाडण्याची जबाबदारी नाबार्डवर सोपविण्यात आली आहे. भारतातील ग्रामीण विकासाच्या क्षेत्रात नाबार्डची भुमीका अभुतपूर्व आहे.

**नाबार्डची कार्ये :**

नाबार्डच्या प्रमुख कार्यामध्ये प्रोत्साहन आणि विकास, पूनर्वित, वित्तपूरवठा नियोजन देखरेख आणि पर्यवेक्षण यांचा समावेश होतो. नाबार्डचे कार्याचे पुढीलप्रमाणे दोन भागात विभाजन केले आहे.

**नॉन—क्रेडीट संबंधित कार्ये** :

१. क्रेडिट प्लॅनिंग आणि मॉनिटरिंग, विविध एजन्सी आणि संस्थासोबत समन्वय.
२. कृषी कर्ज आणि ग्रामीण विकासाशी संबंधित बाबींवर भारत सरकार, आरबीआय (RBI) आणि राज्य सरकारला धोरण तयार करण्यात मदत करणे.
३. ग्रामीण कर्ज वितरण प्रणाली मजबूत करण्यासाठी सहकारी आणि प्रादेशिक ग्रामीण बॅंकाच्या (RRBs) संस्थात्मक विकास आणि क्षमता वाढविणे, प्रादेशिक ग्रामिण बॅंक (RRBs) राज्य सहकारी बॅंका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंका (DCCBs), राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बॅंका (SCARDBs) ची ऐच्छिक तपासणी आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे.
४. शेती, शेतीबाहय, सुक्ष्म वित आर्थिक समावेशन, सरकार प्रायोजित कार्यक्रमांसह अभिसरण या क्षेत्रातील प्रचारात्मक आणि विकासात्मक उपक्रम राबविणे.
५. प्रादेशिक ग्रामीण बॅंक आणि सहकारी बॅंकांच्या आर्थिक समावेशाच्या प्रयत्नांना पाठिंबा देणे.
६. उपजिवीकेच्या संधी आणि सुक्ष्म उपक्रमांना प्रोत्साहन देण्यावर भर देणे.
७. सहकारी संस्थाचे कर्मचारी आणि मंडळ सदस्य आणि ग्रामीण वित्तीय संस्थाचे कर्मचारी यांची क्षमता वाढविणे.
८. संशोधन आणि विकास, ग्रामीण नवकल्पना इत्यादींना प्रोत्साहन देणे.

**क्रेडिट संबंधित कार्ये :**

१. ग्रामिण पायाभूत सुविधांचा विकास आणि सहकारी पतसंस्थांना मजबूत करण्यासाठी राज्य सरकारांना कर्ज उपलब्ध करणे.
२. भारत सरकारच्या निवडक भांडवली गुंतवणूक अनुदान योजनांच्या एजन्सीमधून आर्थिक सहाय्यता प्रदान करणे.
३. ग्रामीण भागातील शेती आणि शेती बाहेरील क्रियाकल्पांसाठी गुंतवणूक क्रेडिट (दिर्घकालीन कर्ज) आणि उत्पादन आणि विपणन क्रेडिट (अल्पकालीन कर्ज) उद्देशांसाठी ग्रामीण वित्तीय संस्थांना पूनर्वित प्रदान करणे.
४. गोदामांच्या पायाभूत सुविधांसाठी राज्य सरकारे, राज्य/केंद्र सरकारच्या मालकीच्या / सहाय्यित संस्था, सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक संस्था, (FPOs) शेतकरी समूहांचे महासंघ, प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) सहकारी विपणन संस्था यांना (CMS) किंवा तत्सम, कार्पोरेट कंपन्या वैयक्तिक उद्योजक यांना कर्ज उपलब्ध करून देणे.
५. सहकारी आणि उत्पादक संस्थांना थेट कर्ज देणे, नाबार्ड पायाभूत सुविधा विकास सहाय्य अंतर्गत राज्य मालकीच्या संस्था/कार्पोरेशन्सना समर्थन आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनासाठी छत्री कार्यक्रम अंतर्गत व्यक्ती, भागीदारी कंपन्या, कार्पोरेट,एनजीओ, MFIS शेतकरी समूह इत्यादींना प्रत्यक्ष कर्ज

देण्याचे कार्य नाबार्ड मार्फत केले जाते.

**कृषि व ग्रामीण विकासात नाबार्डची भूमिका :**

नाबार्ड आपल्या आर्थिक, विकासात्मक आणि पर्यवेक्षकिय भूमिकेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या सर्वच पैलुचा विचार करून कार्य करित असते. ज्यामध्ये पुनर्वित्त सहाय्य प्रदान करणे, ग्रामीण पायाभूत सुविधांची उभारणी, जिल्हा स्तरावरील पत योजना तयार करणे, क्रेडिट लक्ष प्राप्त करण्यासाठी बॅकिंग उदयोगाला मार्गदर्शन करणे आणि प्रेरित करणे, सहकारी बॅकांचे पर्यवेक्षण करणे, ग्रामीण विकासासाठी नवीन प्रकल्पांची रचना करणे, भारत सरकारच्या विकास योजनांची अंमलबजावणी करणे, हस्तकला कामगीरांना प्रशिक्षण देणे, आणि त्यांना त्यांच्या वस्तू विकण्यासाठी मार्केटिंग प्लेटफॉर्म प्रदान करण्याची नाबार्ड महत्वाची भूमिका पार पाडत आहे. पुढे दिलेल्या योजनांच्या माध्यमातून कृषी व ग्रामीण विकासात नाबार्डची भुमिका किती महत्वपुर्ण आहे हे समजून येईल.

**१. पुनर्वित :**

नाबार्ड सहकारी बॅका आणि प्रादेशिक ग्रामीण बॅकांना उत्पादन,विपणन आणि खरेदी क्रियाकल्पांसाठी पूनर्वित कर्ज उपलब्ध करून देते. नाबार्ड विविध संस्थांना शेतकरी आणि ग्रामीण कारागिराच्या गुंतवणुकीच्या क्रियाकालापांना समर्थन देण्यासाठी पुरेसे कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी त्यांच्या संसाधनाचा पूरक म्हणून दीर्घकालीन आणि मध्यमकालीन पुनर्वित प्रदान करते.

**अ. अल्पमुदतीची कर्ज :**

देशातील अन्नसुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी मदत करणा—या विविध संस्थाव्दारे शेतक—यांना पीक उत्पादनासाठी २०२२—२३ या वर्षात ६४२२४ कोटी रूपये हंगामी कृषी कार्यासाठी तर हंगामी कृषी ऑपरेशन्ससाठी ६५५६४ कोटी रूपये आणि २९०७७ कोटी रूपये सहकारी बॅका आणि RRB ला मदत केली SFBS ला पूनर्वित म्हणून ४० कोटी रूपये सहाय्यता प्रदान केली.

**ब. दीर्घकालीन कर्ज :**

नाबार्डने १८ महिने ते ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचे शेती आणि बिगरशेती क्रियाकलापांचा समावेश असलेल्या कार्यासाटी वित्तीय संस्थांना २०२२—२३ या वर्षात १०७०१५ कोटी रूपये प्रदान केले. भारत सरकारने राज्य सहकारी बॅका आणि राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बॅका आणि प्रादेशिक ग्रामीण बॅका (RRBs) यांना कृषी क्रियाकलापांमधील गुंतवणुक कर्जासाठी नाबार्डसह LTRCF ची स्थापना केली. २०२२—२३ या वर्षात दीर्घकालीन पुनर्वित सहाय्य म्हणून १४८७५ कोटी रूपये वितरीत करण्यात आले.

**२. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (RIDF) :**

भारतीय रिझर्व बॅकेने ग्रामीण पायाभूत सुविधा प्रकल्पांना सहाय्य करण्यासाठी १९९५—९६ मधे नाबार्डसोबत RIDF ची स्थापना केली. नाबार्डने RIDF अंतर्गत २०२२—२३ ला ३७३१७ कोटी रूपये वितरीत करून देशातील ग्रामीण पायाभूत सुविधा निधीसाठी महत्वपूर्ण योगदान दिले.

### ३. सूक्ष्म सिंचन निधी (MIF) :

सूक्ष्म सिंचनाची व्याप्ती वाढविण्यासाठी अतिरिक्त संसाधने एकत्रित करण्यासाठी आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेच्या तरतुदींना प्रोत्साहन देण्यासाठी २०१९–२० मध्ये सूक्ष्म सिंचन निधी म्हणून ५००० कोटी मंजूर करण्यात आले. सुक्ष्म सिंचन निधी अंतर्गत २०२२–२३ मध्ये ७४०.७९ कोटी रूपये मंजूर करण्यात आले. त्यापैकी ४३२.०२ कोटी सुक्ष्म सिंचन योजनेवर खर्च करण्यात आले.

### ४. नाबार्ड पायाभूत सुविधा विकास सहाय्य (NIDA) :

नाबार्ड इन्फ्रास्ट्रकचर डेव्हलपमेंट असिस्टन्स (NIDA) ग्रामीण पायाभूत सुविधांना वित्तपुरवठा करण्यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांना दीर्घकालीन कर्ज उपलब्ध करून दिले जाते. NIDA अंतर्गत कृषी पायाभूत सुविधा, ग्रामीण कनेक्टीव्हीटी, अक्षय उर्जा, विज पारेषण, पिण्याचे पाणी आणि स्वच्छता आणि इतर सामाजिक आणि व्यावसायिक पायाभूत सुविधांसाठी प्रकल्पांना वित्तपुरवठा केला जातो. २०२२–२३ या वर्षात मुदती कर्ज ३५८१.७१ कोटी रूपये मंजूर करण्यात आले. तसेच ग्रामीण शैक्षणिक संस्था प्रकल्प ०. ५५%, २०.१७ कोटी रूपये, सिंचन प्रकल्प ८५.६%, ३०६६.५४ कोटी रूपये, ग्रामीण पर्यटन प्रकल्प १. २५%, ४.४० कोटी रूपये आणि ग्रामीण आरोग्य प्रकल्प १२.६%, ४५० कोटी रूपये असे २०२२–२३ मध्ये एकूण ६३२९.४८ कोटी रूपये वितरीत करण्यात आले.

### ५. डेअरी प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा विकास निधी (DIDF) :

केंद्रीय अर्थसंकल्प २०१७–१८ मधील घोषणेनुसार भारत सरकारने नाबार्डमधे डेअरी प्रोसेसिंग आणि इंन्फास्ट्रकचर डेव्हलपमेंट फंड (DIDF) तयार केला. ज्याव्दारे ८००४ कोटी रूपयाची तरतूद करण्यात आली. यात दुधाची प्रक्रिया आणि मुल्यवर्धनासाठी आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधा वाढवणे आणि प्राथमिक उत्पादकांना योग्य किंमत मिळण्याची हमी देणे तसेच इतर पायाभूत सुविधा निर्माण करणे. यासाठी २०२२–२३ या आर्थिक वर्षात एकुण ७३५.२६ कोटी रूपये वितरीत करण्यात आले.

### ६. मत्स्यपालन आणि मत्स्यपालन पायाभूत सुविधा विकास निधी (FIDF) :

केंद्रीय अर्थसंकल्प २०१८–१९ मध्ये केलेल्या घोषणेनुसार भारत सरकारने मत्स्यव्यवसाय आणि मत्स्यपालन पायाभूत सुविधा विकास निधी (FIDF) ची एकूण ७५२२.४८ कोटी रूपयाची तरतूद करण्यात आली. यात फिशिंग हार्बर्स, फिश लॅंडिंग सेंटर्स, आधुनिकीकृत राज्य मत्स्यबीज फार्म, आधुनिक फिश मार्केट, रोग निदान प्रयोगशाळा, आणि प्रशिक्षण पायाभूत सुविधा यासाठी २०२२–२३ या वर्षात १९८७.९९ कोटी रूपये मंजूर करण्यात आले.

### ७. किसान क्रेडीट कार्ड (KCC) :

ही योजना १९९८ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बॅकांनी भारतातील शेतक–यांना पीक उत्पादन, कृषी उपकरणे खरेदी, शेतीसाठी योग्य साहित्य खरेदी आणि इतर कृषी संबंधित खर्चासाठी गुरे खरेदी, पंप संच, जमीन विकास, वृक्षारोपण, ठिबक सिंचन इ. भांडवली खर्चासाठी अल्प मुदतीचे कर्ज व्यापारी बॅका, प्रादेशिक

ग्रामीण बॅंका आणि राज्य सहकारी बॅंका यांच्या सहाय्याने राबविण्यासाठी नाबार्ड साहाय्य करते. ३० मार्च २०२३ पर्यंत देशात ७.३५ कोटी किसान केडीट कार्ड वितरीत करण्यात आले असून ८.८५ लाख कोटी रूपयाचे कर्ज मंजूर करण्यात आले.

**निष्कर्ष :**

भारतातील कृषी व ग्रामीण विकासासाठी योजनांच्या विविध श्रेणी, आर्थिक साहाय्य, शेतक—यांना सक्षम करणे, ग्रामीण भागात पायाभूत सुविधा प्रदान करण्यासाठी, प्रक्रिया उदयोगाला प्रोत्साहन देण्यासाठी, शेतक—यांना अल्प मुदतीव मुदती कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी नाबार्डची भुमिका महत्वपुर्ण आहे. ग्रामीण भागाच्या विकासात नाबार्डने प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आर्थिक योगदान प्रदान केले. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार प्राप्त झाला असून कृषी उत्पादनात सुध्दा वाढ करण्याचे कार्य नाबार्डने केले आहे. ज्यामुळे देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी नाबार्डची भूमिका महत्वपुर्ण आहे.

**संदर्भ :**


- https://www.nabard.org/contemt.aspx
- https://groww.in/loans/nabard
- https://en-wikipedia.org/wiki/national_bank_for_Agriculture
- https://www.jagramkjosh.com/nabard
- https://www.nabard.org/hindi/about-department
- https://www.paisabazaar.com/hindi
- https://www.nabard.org/hindi/content1